पान १ वरून

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांवर आनंदवर्षाव

बुधवारपासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी सायंकाळी सह्याद्री अतिथीगृहात आयोजित करण्यात आली होती. मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पंच्चाहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठांना मोफत एसटी प्रवासाचा आणि महागाई भत्त्यात वाढ करण्याचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

वैद्यकीय उपकरणे खरेदी जीईएम पोर्टलद्वारे :राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत केली जाणारी वैद्यकीयविषयक उपकरणे व इतर अनुषंगिक खरेदी ही गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (जीईएम) या पोर्टलच्या माध्यमातून करावी, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले आहेत. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चेअंती यासंदर्भात निर्देश दिले.

सीएनजी ६, पीएनजी गॅस ४ रुपयांनी स्वस्त

महागाईची झळ बसलेल्या सामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नैसर्गिक वायूंच्या किमतींचा आढावा घेतल्यानंतर सीएनजी आणि पीएनजीच्या दरामध्ये कपात करण्यास परवानगी देण्यात आली. त्यानंतर सीएनजीमध्ये प्रतिकिलो ६ रुपयांनी, तर पीएनजीमध्ये प्रतिकिलो ४ रुपयांनी कपात केली आहे. महानगर गॅसच्या या निर्णयानंतर मुंबईत आता सीएनजी ८० रुपये, तर पीएनजी ४८.५० रुपये प्रतिकिलोमध्ये मिळणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तूंच्या दरामध्ये सतत होणाऱ्या वाढीमुळे सामान्यांचे कंबरडे मोडले आहे. महागाईमुळे सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना महिन्याचा खर्च चालवणे मुश्कील झाले आहे. अशात २ ऑगस्ट रोजी महानगर गॅसने सीएनजी आणि पीएनजीच्या दरात अचानक वाढ केली होती. या दरवाढीमुळे सामान्यांमध्ये नाराजी होती. आता दरकपातीचा निर्णय घेतल्याने काहीसा दिलासा मिळणार आहे.

आजपासून दूध दोन रुपयांनी महाग

दुधाच्या दरात २ रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारपासून नवीन दर लागू होतील, असे दोन्ही कंपन्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे आता ग्राहकांचा सकाळचा चहा महाग होणार आहे. जीसीएमएमएफ आपल्या दुग्धजन्य पदार्थांचे अमूल या ब्रँड अंतर्गत मार्केटिंग करते. जीसीएमएमएफने अहमदाबाद आणि गुजरातमधील सौराष्ट्र प्रदेश, दिल्ली-एनसीआर, पश्चिम बंगाल, मुंबई आणि इतर बाजारपेठांमध्ये दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, असे आनंद-मुख्यालय असलेल्या फेडरेशनने एका निवेदनात म्हटले आहे. अहमदाबाद आणि सौराष्ट्रच्या बाजारपेठेत आता ५०० मिली अमूल गोल्डची किंमत ३१ रुपये, अमूल ताझा २५ रुपये आणि अमूल शक्तीची किंमत २८ रुपये आहे. मदर डेअरीने यापूर्वी मार्चमध्ये दिल्ली-एनसीआर मध्ये दुधाच्या दरात २ रुपयांनी वाढ केली होती. मदर डेअरी ही दिल्ली-एनसीआर बाजारपेठेतील प्रमुख दूध पुरवठादारांपैकी एक आहे आणि पॉली पॅक आणि व्हेंडिंग मशीनद्वारे दररोज ३० लाख लिटरहून अधिक दूध विकते. मदर डेअरीच्या एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले की, कंपनी १७ ऑगस्ट २०२२ पासून दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ करणार आहे. नवीन दर सर्व दुधाच्या पॅकवर लागू होतील. फुल क्रीम दुधाचे दर बुधवारपासून प्रतिलिटर ५९ रुपयांवरून ६१ रुपयांपर्यंत वाढणार आहेत. टोन्ड दुधाची किंमत ५१ रुपये आणि दुप्पट दुधाची किंमत ४५ रुपये प्रतिलिटर होईल. गायीच्या दुधाचा दर ५३ रुपये प्रतिलिटर झाला आहे. बल्क व्हेंडिंग दुधाची (टोकन मिल्क) किंमत ४६ रुपये प्रति लिटरवरून ४८ रुपये करण्यात आली आहे.

खर्चातील वाढीमुळे निर्णय : कंपनीच्या वादामुळे गेल्या पाच महिन्यांत कंपनीच्या खर्चात लक्षणीय वाढ झाली असल्याचे संबंधित एका अधिकाऱ्याने सांगितले आहे. शेतकऱ्यांकडून दूध खरेदीचा खर्च १० ते ११ टक्क्यांनी वाढला आहे. तसेच उन्हाळी हंगाम लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याच्या किमतीतही लक्षणीय वाढ झाली आहे. अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, शेतकऱ्यांकडून खरेदीच्या खर्चात झालेल्या वाढीचा अंशतः बोजा ग्राहकांवर टाकला जात आहे. कंपनीला विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी सुमारे ७५-८० टक्के उत्पन्न शेतकऱ्यांकडून दूध खरेदीवर होते.

शिवसेनेच्या सर्व ५५ आमदारांना व्हीप जारी!

करण्याचा व्हीप जारी केला. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले हे 'व्हीप वॉर' आता पावसाळी अधिवेशनातही सुरू राहणार आहे.मूळ शिवसेनेचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू आहेत, तर बंडखोर गटाकडून भरत गोगावले यांना मुख्य प्रतोद नेमले आहे. त्यामुळे शिवसेनेच्या दोन गटांत सध्या व्हीप वॉर सुरू आहे. बंडखोर गटाचा दावा आहे की, आम्हीच मूळ शिवसेना आहे. मात्र विधानसभेत बंडखोर गटाचा मुख्यमंत्री असला तरी विधान परिषदेत शिवसेनेचा विरोधी पक्षनेता आहे. राज्यात किंबहुना देशात अशी प्रथमच विचित्र राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. येत्या २२ ऑगस्ट रोजी सुप्रीम कोर्टात शिवसेना आणि बंडखोर गटांच्या विविध याचिकांवर एकत्रित सुनावणी होणार आहे. त्यामुळे २२ ऑगस्ट रोजी यावर काही निर्णय येणार की सुनावणी आणखी पुढे ढकलली जाणार, याची उत्सुकता आहे.

बंडखोर गटाचा दावा कायम : आम्हीच मूळ शिवसेना आहोत. विधानसभेत, लोकसभेत लोकप्रतिनिधींमध्ये आमचे बहुमत आहे. सुप्रीम कोर्टात आणि केंद्रीय निवडणूक आयोगाकडे आम्ही भक्कमपणे बाजू मांडली आहे. त्यामुळे आमची कुठेही अडचण नाही. तरीही सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल तो आम्हाला मान्य असेल, अशी प्रतिक्रिया बंडखोर गटातील नेते व राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी 'व्हीप वॉर'बाबत दिली.

काश्मीरमध्ये बस दरीत कोसळून ७ जवानांचा मृत्यू

यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांनी जवानांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला. आयटीबीपीचे ३७ जवान व काश्मीर पोलीस दलाचे २ पोलीस कर्मचारी अमरनाथ यात्रेची ड्युटी संपल्यानंतर बसने चंदनवाडी येथून पहलगामकडे जात होते. यादरम्यान सकाळी ११ वाजून १० मिनिटांच्या सुमारास ब्रेक निकामी झाल्याने अनियंत्रित झालेली बस पहलगाम क्षेत्रातील १०० फूट खोल दरीतील नदीत कोसळली. या भीषण अपघातात २ जण जागीच ठार झाले. यानंतर राबवलेल्या बचाव अभियानादरम्यान जखमींना हेलिकॉप्टरच्या मदतीने श्रीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान आणखी ५ जवानांचा मृत्यू झाला. जखमींपैकी काही जवानांवर अनंतनाग येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींपैकी ६ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना हेलिकॉप्टरने श्रीनगर येथील रुग्णालयात आणले गेले. बचाव अभियानासाठी सीमा सुरक्षा दलाचे(बीएसएफ) हेलिकॉप्टर तैनात केल्याची माहिती 'आयटीबीपी'च्या प्रवक्त्याने दिली. अपघातातील जखमी जवानांना सर्वतोपरी मदत करण्यात येत असल्याची माहिती जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पीडित जवानांबद्दल शोक व्यक्त केला. अनंतनाग जिल्ह्यातील बस अपघातात 'आयटीबीपी' जवानांच्या मृत्यूमुळे दुःख झाले. पीडित जवानांच्या कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत, असे त्या म्हणाल्या. जखमींनी लवकर बरे व्हावे, यासाठी राष्ट्रपतींनी प्रार्थना केली.

घाऊक महागाई दरामध्ये घट

(पान १ वरुन) झालेली वाढ, महागडे कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, मूलभूत धातू, रसायने आणि रासायनिक उत्पादने यामुळे जून महिन्यात घाऊक महागाईत वाढ झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत घाऊक महागाई दरात झालेली वाढ हे प्रामुख्याने खाद्यपदार्थांच्या महागाईमुळे आहे. मात्र, जूनच्या तुलनेत जुलै महिन्यात अन्नधान्याच्या महागाईत घट झाली आहे. जुलैमध्ये अन्नधान्य महागाईचा दर ९.४१ टक्के होता, तर जूनमध्ये अन्नधान्य महागाईचा दर १२.४१ टक्के झाला आहे. तर जुलै महिन्यात भाज्यांच्या महागाईचा दर १८.२५ टक्क्यांवर आला आहे, तर जूनमध्ये हा दर ५६.७५ टक्क्यांवर होता. जुलै महिन्यात बटाटे व फळभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. धान, गहू, डाळीचे भावही वाढले आहेत. घाऊक महागाईच्या आकडेवारीनुसार जुलै महिन्यात इंधन आणि विजेच्या घाऊक महागाईचा दर ४०.३८ टक्क्यांवरून ४३.७५ टक्क्यांवर पोहोचला आहे. पण मे महिन्याच्या ४०.६२ टक्क्यांच्या महागाई दरापेक्षा तो किरकोळ कमी आहे.

जून महिन्यात उत्पादन वस्तूंच्या घाऊक महागाईचा दर मे महिन्यातील ९.१९ टक्क्यांवरून ८.१६ टक्क्यांवर आला आहे. याआधी किरकोळ महागाईची आकडेवारी समोर आली होती. किरकोळ चलनवाढीचा दरही जुलै महिन्यात खाली आला असून तो ६.७१ टक्क्यांवर आला आहे.

हे सरकार विश्वासघाताच्या पायावर उभे - अजित पवार

(पान १ वरुन) राज्यात महिला, बालिकांवर अत्याचारांच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून सत्ताधारी पक्षांचे सदस्य चिथावणीखोर भाषा वापरून लोकांना भडकावण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून सरकारला सत्तेचा दर्प चढला आहे. या सरकारची विश्वासार्हता आणि वैधताही संदिग्ध आहे, असा घणाघाती आरोप पवार यांनी यावेळी केला. मुंबईतील विधानभवनाच्या वार्तांहर कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत पवार यांनी सर्व विरोधी पक्षांच्या वतीने भूमिका मांडली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, भाई जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषदेतील नवनिर्वाचित सदस्य एकनाथ खडसे, शिवसेनेचे नेते अनिल परब आदी यावेळी उपस्थित होते. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन बुधवार, १७ ऑगस्टपासून सुरू होत असून त्याच्या आदल्या दिवशी घेतलेल्या या पत्रकार परिषदेत विरोधी पक्षांनी अधिवेशनातील आपला रोख स्पष्ट केला. सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या चहापानाच्या निमंत्रणावर विचार करण्यासाठी आणि अधिवेशनाची रणनीती ठरवण्यासाठी विरोधी पक्षांच्या सर्व नेत्यांची मंगळवारी बैठक झाली. या बैठकीला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, नाना पटोले, अनिल परब, अजय चौधरी, रईस शेख, बाळाराम पाटील, कपिल पाटील, सुनील प्रभू, सुरेश वरपूडकर, अनिल पाटील, सचिन अहिर, मनीषा कायंदे आदी प्रतिनिधी आमदार उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या अभिमानाला धक्का लावण्याचे काम आपल्याकडून सातत्याने घडत आहे, असा आरोप करून पत्रात पुढे म्हटले आहे की, स्वराज्याचे दुसरे छत्रपती स्वराज्यरक्षक संभाजी महाराजांच्या स्मारक विकासाच्या कामाला आपण स्थगिती दिली.

घरफोड्या करणाऱ्या चौघांची टोळी जेरबंद

सांगली / प्रतिनिधी

घरफोड्या करणाऱ्या चौघांची टोळी जेरबंद करण्यात एलसीबीला यश आले. या चौघांकडून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याकडील ५० घरफोड्या उघडकीस आल्या. त्यांच्याकडून १५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामध्ये साडेबारा लाख रुपयांचे सोन्याचे दागिने, दीड लाख रुपयांची चांदी आणि ९५ हजार रुपयांच्या रोख रकमेचा समावेश असल्याची माहिती पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोबाईल भैरु पवार (वय १९, रा. करंजवडे, ता. वाळवा), घायल सरपंच्या काळे (वय ४६, रा. चिकुर्डे, ता. वाळवा), इकबाल भैरु पवार (वय ४०, रा. करंजवडे, ता. वाळवा), प्रविण राज्या शिंदे (वय ३१, रा. गणेशवाडी, वडूज, जि. सातारा) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

५० घरफोड्या उघडकीस

सांगली : घरफोडीतील अटक केलेल्या संशयितासह पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम, एलसीबीचे निरीक्षक सतीश शिंदे व पोलीस . (छाया : धामणीकर)

पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम यांनी जिल्ह्यातील घरफोड्या उघडकीस आणण्याच्या सूचना एलसीबीचे निरीक्षक सतीश शिंदे यांना दिल्या होत्या. एलसीबीने यासाठी खास पथक नेमले होते. रेकॉर्डवरील गुन्हेगार मोबाईल पवार, घायल काळे, इकबाल पवार, प्रवीण शिंदे यांनी जिल्ह्यात घरफोड्या केल्याची माहिती एलसीबीच्या पथकाला मिळाली. माहिती मिळाल्यानंतर कारंदवाडी (ता. वाळवा) येथील जलस्वराज्य प्रकल्पाजवळ पोलिसांनी छापा टाकून मोबाईल पवार आणि घायल काळे यांना ताब्यात घेतले. तर डोंगरवाडी येथून इकबाल पवार आणि प्रवीण शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या चौघांकडे कसून चौकशी केल्यानंतर त्यांनी त्यांच्या अन्य दोन साथीदारांसह जिल्ह्यातील बंद घरे फोडून चोरी केल्याचे निष्पन्न झाले. या चौघांकडून ५० घरफोड्या उघडकीस आल्या. पोलिसांनी त्यांच्याकडून १२ लाख ५० हजार रुपये किंमतीचे २५० ग्रॅम सोन्याचे दागिने, १ लाख ५० हजार रुपयांची दीड किलो चांदीचे दागिने आणि ९५ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. एलसीबीचे निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अरुण औताडे, मेघराज रुपनर, हेमंत ओमासे, आर्यन देशिंगकर, विमल नंदगावे, कॅप्टन गुंडवाडे, स्नेहल शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

अर्भकाच्या खूनप्रकरणी आईस जन्मठेप

सांगली / प्रतिनिधी : मुलगी झाल्याने नाराज होऊन अवघ्या तीन दिवसातच तिचा दुपट्ट्याने गळा आवळून खून केल्याप्रकरणी दोषी ठरवून सुमित्रा गंगाप्पा जट्टी (वय ३०, रा. करगुट्टी, यल्लापूर, ता. हुक्केरी, जि. बेळगाव) हिला जिल्हा व सत्र न्यायाधीश एच. एल. मनवर यांनी जन्मठेप आणि दंडाची शिक्षा ठोठावली.

आरोपी सुमित्रा जुट्टी हिचे पहिले मूल हे तीन दिवसांचे आत मयत झाले होते. ती कर्नाटकातून महाराष्ट्रात येवून सिव्हील हॉस्पिटलमध्ये बाळंतपणासाठी ॲडमिट झाली होती. तिला मुलगी झाल्याचे कळल्यापासून ती नाराज होती. मुलगी झाली म्हणून तिने दि. १८ ऑक्टोबर २०२१ रोजी रात्री ८.३५ च्या सुमारास स्त्री जातीच्या अर्भकाचा गळा आवळून खून केला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. सरकार पक्षातर्फे दहा साक्षीदार तपासण्यात आले होते. त्यामध्ये रोशनी कौशल शिंदे ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होती. तिने आरोपी लहान मुलाचा गळा आवळत असताना पाहिले. ही बाब तिने तेथील परिचारिका रुपाली बजंत्री व अन्य परिचारिकांना सांगितली होती. त्यांनी लगेच लहान अर्भकास लहान मुलांचे अतिदक्षता विभागात दाखल केले होते. परंतु, डॉ. खोत यांनी उपचार करण्याचा प्रयत्न केला असता उपचारादरम्यान लहान अर्भक मयत झाले.

ढालगाव येथील शिक्षक अपघातात ठार

ढालगाव / वार्ताहर

गुहागर-विजापूर महामार्गावर चोरोचीजवळ मोटारसायकल अपघातात ढालगाव येथील उच्चशिक्षित अजिंक्य राम भोसले (वय २५) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना सोमवारी सकाळी घडली.

अजिंक्य भोसले हे आपल्या मोटारसायकलवरून कुंभारी येथील न्यू इंग्लिश स्कुल व ज्युनियर कॉलेज या विद्यालयात स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाला चालले होते. विद्यालयात त्यांची शिक्षक म्हणून निवड झाली होती. सोमवारी विद्यालयातील त्यांचा पहिलाच दिवस होता. शिवाजी विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते विद्यार्थी होते. फिजिक्स विषयात एम.एस्सी. केली. ढालगाव, कवठेमहांकाळ येथील महाविद्यालयात गणित व फिजिक्स विषय शिक्षक म्हणूनही काम केले होते. कुंभारीला जात असताना त्यांचे मोटारसायकल वरील नियंत्रण सुटून गाडी रस्ताकडेला लावलेल्या दगडाला धडकली. यामध्ये ते पायाला मार लागून गंभीर जखमी झाले. प्रचंड रक्तस्राव झाला. याचवेळी आरेवाडी येथील प्राथमिक शिक्षक मनोज कुमार वसंतराव कोळेकर हे गाडीतून जांभूळवाडी येथील आपल्या नोकरीसाठी सकाळी चालले असता त्यांना ही घटनां दिसताच त्यांनी क्षणाचा विलंब न करता भोसले आपल्या गाडीत स्वतः उचलून ढालगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. पुढील उपचारासाठी कवठेमहांकाळला घेऊन जात असताना वाटेतच त्यांचे निधन झाले. वेळेत उपचार मिळाले असते तर कदाचित त्यांचे प्राण वाचले असते. त्यांच्या जाण्याने ढालगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेची नोंद कवठेमहांकाळ पोलिसात झाली आहे.

शुद्धीपत्रक

वाशी नगर पंचायत ई-निविदा प्रसिद्धीकरण सुचना जाहिरातीमध्ये दि. १५-०८-२०२२ रोजी संकेतस्थळ http://mahatenreds.gov.in ऐवजी http://mahatenders.gov.in असे वाचावे.

आदेशावरुन

कवलापूरला घरातून रोकड लंपास

सांगली / प्रतिनिधी : मिरज तालुक्यातील कवलापूर येथील सोसायटीजवळ राहणाऱ्या प्रदीप उत्तम भोरे (वय ३२) यांचे घर भरदिवसा फोडून चोरट्याने कपाटातील १ लाख ७३ हजार २०० रूपये लंपास केले. याप्रकरणी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. भोरे हा वाहन चालक म्हणून काम करतात. काल १५ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सात या वेळेत चोरट्याने त्यांच्या बंद घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. आतील कपाटात ठेवलेले रोख एक लाख ७३ हजार रूपये घेऊन चोरट्याने पलायन केले. सायंकाळी सात वाजता भोरे यांना घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आले.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सूचना क्र. : CO-16031 (11)/14/2022-COMM

कोकण रेल्वे वन स्टेशन - वन प्रॉडक्ट (ओएसओपी) योजनेअंतर्गत हस्तकला, वस्त्रोद्योग व हातमाग, पारंपरिक कपडे, स्थानिक कृषी निर्मित/प्रक्रियान्वित/अर्धप्रक्रियान्वित खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देऊ इच्छित आहे. चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, थिविम, करमाळी, मडगाव, कारवार व उडुपी स्थानकांत आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करू इच्छिणाऱ्या इच्छुक सहभागींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज प्रपत्र व ओएसओपी पॉलिसी तपशील **www.konkanrailway.com** वरून (Path-Department-Commercial-Form for OSOP & Policy guidelines) डाऊनलोड करता येऊ शकेल. इच्छुक सहभागींनी त्यांचे अर्ज संलग्न दस्तावेजांसमवेत संबंधित स्टेशन मास्तरांकडे सादर करावेत.

REQUIREMENT

Assistant + Accountant (Female)

Qualifaction - B.com, BA. etc

Knowledge in : Accounting and Records Computer application. Social Media Handling. English, Marathi must.

Timing : 10 am to 6 pm

Sameer Thakare

Administrator - KMMMF, Ahmednagar
502, Olive Green Apartment,
Opp. Gera Regent Park, Off Pancard Club Road, Baner, Pune 411045

पाहिजेत

नामांकित ज्वेलरी प्रतिष्ठान करीता

सेल्स एक्झिक्युटिव्ह
कॉम्प्युटर ऑपरेटर
कस्टमर सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह

वयोमर्यादा - 21 ते 30

महिला,पुरुष अनुभवी उमेदवारांना प्राधान्य
दि. 23/08/2022 पर्यंत आपले परिचय पत्र,
फोटो व लिव्हिंग सर्टिफिकेट
hrpune@rcbafnajewellers.com वर पाठवावे.

रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स
नळ स्टॉप, कर्वे रोड, पुणे

कुपवाडमध्ये विजेचा धक्का बसून म्हैशीचा मृत्यू

कुपवाड / प्रतिनिधी

कुपवाड औद्योगिक वसाहतीमधील पेट्रोल पंपासमोरील मुख्य रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या आर्थिंग तारेचा शॉक चरत असलेल्या म्हैशीला बसल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना सोमवारी सायंकाळी घडली. शहरातील परसू वसंत माने (रा. शांत कॉलनी, कुपवाड) हे सोमवारी म्हैशी घेऊन कुपवाड एमआयडीसीत चरायला घेऊन गेले होते. संध्याकाळी माने यांच्या म्हैशी कुपवाड एमआयडीसीतील मुख्य रस्त्याच्या बाजूला चरत कुपवाडकडे जात होत्या. रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या उघड्यावर असलेल्या आर्थिंग तारेचा शॉक चरत असलेल्या म्हैशीला बसल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, तळमजला, वसंत प्लाझा, बागल चौक, राजाराम रोड, राजारामपुरी, कोल्हापूर-४१६ ००८.

(नियम ८ (६) ची तरतूद पाहा)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

समस्त जनतेला आणि विशेषत्वाने कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंकडे तारण/प्रभारात असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता, जी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रतीकात्मक ताब्यात** घेतली आहेत ती ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आधारावर खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/कायदेशीर वारसांची नावे कर्ज खाते क्र.	काही असल्यास, ज्ञात भारासह प्रतिभूत मत्तेचा तपशील	थकीत रक्कम	आरक्षित मूल्य / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	अतुल व्रजलाल शाह (ऋणको) पारूल अतुल शाह (सहऋणको) कर्ज खाते क्र. एलएचकेपीआर०००००१२७६९३५५	स.क्र. ३८, हि. क्र. ३० आणि ३१, मिळकत क्र.-युनिट क्र. व्ही ०३ आणि व्ही ०४, शहर-भूम, तालुका-सावंतवाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग, राज्य-महाराष्ट्र.	रु. ५११,६२,६२५/- ०५ ऑगस्ट २०२२ रोजी	रु. ५२,१६,८००/- / रु. ५,२१,६८०/-	१४ सप्टें. २०२२ स. ११.०० वा. ते दु. ०३.०० वा.	२० सप्टें. २०२२ दु. ०२.०० वा. ते दु. ०३.०० वा.

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी ग्लोबल टेकच्या संकेतस्थळावर (URL Link-/ https://BestAuctionDeal.com) वर करण्यात येईल. गहाणदार/सूचना पाठविलेले यांना **१९ सप्टेंबर २०२२ रोजी सायं. ०५.०० वा.** पूर्वी पुढील व्याजासह संपूर्ण थकबाकी चुकती करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, अन्यथा सदर तारण मालमत्तेची परिशिष्टानुसार विक्री करण्यात येईल.

प्रस्तावित बोलीदारांनी इसारा रक्कम ठेव आरटीजीएस/धनाकर्ष (डीडी) (रकाना ई पाहा) आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि., तळमजला, वसंत प्लाझा, बागल चौक, राजाराम रोड, राजारामपुरी, कोल्हापूर-४१६ ००८** येथे **१९ सप्टेंबर २०२२** रोजी किंवा तत्पूर्वी दु. ०४.०० वा. पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्या की, प्रस्तावित बोलीदार त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळाद्वारे सादर करू शकत नसतील तर निविदा दस्तावेजाची स्वाक्षरित प्रत उपरोक्त नमूद वेळेनुसार **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि., तळमजला, वसंत प्लाझा, बागल चौक, राजाराम रोड, राजारामपुरी, कोल्हापूर-४१६ ००८ येथे १९ सप्टेंबर २०२२** रोजी किंवा तत्पूर्वी **सायं. ०५.०० वा.** पूर्वी सादर करू शकतील. इसारा रक्कम ठेव धनाकर्ष/प्रदान आदेश ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.**'' यांच्या नावे **कोल्हापूर** येथे देय स्वरूपात राष्ट्रीयीकृत/अनुसूचित बँकेकडील असावा.

निरीक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरण संबंधित अधिक स्पष्टीकरणासाठी, कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांना ७०२१०७२८६९** वर किंवा आमच्या सेल्स आणि मार्केटिंग पार्टनर नेक्सझेन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांना संपर्क करा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही पुढील कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली निरस्त करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया संकेतस्थळ https://www.icicihfc.com/ वर भेट द्या.

दिनांक : १७ ऑगस्ट २०२२
ठिकाण : कोल्हापूर

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

ऑफर — घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी — ऑफर

APPOINTMENT

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

आता सवलतीच्या दरात

पश्चिम महाराष्ट्र	रु. ४५००/-
मुंबईसह कोकण विभाग	रु. ४५००/-
उत्तर महाराष्ट्र	रु. ४५००/-
मराठवाडा विभाग	रु. ४५००/-
विदर्भ	रु. ४५००/-
कोणतेही दोन विभाग	रु. ६५००/-
कोणतेही तीन विभाग	रु. १००००/-
कोणतेही चार विभाग	रु. १३५००/-
संपुर्ण महाराष्ट्र	रु. १७०००/-

वरील जाहिरातीच्या रकमेवर 5% जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२२ पासून लागू | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा **18002081019**
E-mail:customercare@sapp.in

Shirpur Education Society

RECRUITMENT

Application are invited for the vacant posts in Shirpur Education Society's No Grant basis Pharmacy Colleges in Shirpur

Name of Dept. / College Name	R.C. Patel Institute of Pharmaceutical Education & Research, Shirpur			R.C. Patel Institute of Pharmacy, Shirpur		H.R. Patel Institute of Pharmaceutical Education & Research, Shirpur
	Prof.	Asso. Prof.	Asst. Prof.	Asso. Prof.	Asst. Prof.	Asst. Prof.
Pharmaceutics	-	03	04	01	-	03
Pharma. Chemistry	-	-	02	-	-	03
Pharmacology & PP	-	01	01	01	-	02
Pharmacognosy	-	02	02	01	02	-
Pharma. Technology	-	01	-	-	-	-
Industrial Pharmacy	-	01	-	-	-	-
M.Tech. (Cosmetics)	01	02	-	-	-	-
MBA-Pharm Mgmt.	01	02	03	-	-	-
Training & Placement Officer	-	-	-	-	-	01
Physical Director	-	-	01	-	01	-

Qualification and Experience as per the norms of AICTE/PCI and rules of KBC North Maharashtra University, Jalgaon. Eligible candidates should apply within 7 days from the date of publication of this advertisement. For qualification and experience details log on www.rcpatelpharmacy.co.in / www.hrpatelpharmacy.co.in. 30% reservation for women will be observed. **Govt. has offered to the college, status of minority, therefore reservation for posts mentioned in the advertisement will not be applicable.

Applications should be send at following address or email your resume on resume@rcpatelpharmacy.co.in

R. C. Patel Institute of Pharmaceutical Education and Research,
R. C. Patel Institute of Pharmacy,
H. R. Patel Institute of Pharmaceutical Education and Research,
Karvand Rd. Shirpur Dist. Dhule 425405

Shri. Amrishbhai R. Patel, President | Shri. Rajgopal C. Bhandari, Vice - President